SYNOPSIS OF THE THESIS

" A CRITICAL SURVEY OF AUTOBIOGRAPHIES IN MODERN MARATHI LITERATURE "

STATEMENT NO. I

HOW THE PRESENT WORK TENDS TO THE GENERAL ADVANCEMENT OF KNOWLEDGE.

आत्मचरित्र हा वाङ्‌मयाचा मोठा विलोभनीय असा प्रकार आहे. पाश्चिमात्य वाङ्मयांत आत्मचरित्र लिहून लाखोंनी पैसे मिळविणारे लेखक आहेत. म्हणजे आत्मचरित्राची महती आणि गोडी वाचकांना किती वाटते हें यावरून दिसून येतें. याचें कारण असें कीं आत्मचरित्रकाराचें अंतरंग दर्शन आपणास व्हावें अशी वाचकांची स्वाभाविक इच्छा असते. कारण प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत अनेक समस्या असतात आणि लहान मोठे अनेक प्रश्न उद्‌भवतात. त्या सर्व समस्यांचीं समाधानकारक उत्तरें आपणाला मिळत नाहींत तसेंच जीवनांतील सर्व प्रश्नांचीं कोडींही सुटत नाहींत.

अशा वेळीं आत्मचरित्राच्या वाचनानें त्या व्यक्तीचे जीवन अगदीं जवळून पाहण्याचा प्रसंग प्राप्त झालेला असतो. कारण आत्मचरित्र म्हणजे स्वतःच लिहिलेलें स्वतःच्या जीवनाचें चित्र होय. यामुळे उत्कृष्ट आत्मचरित्रें जगांतील सर्व भाषांतून लोकप्रिय झालीं आहेत.

तशांतच आत्मचरित्र लिहिणारी व्यक्ति राजकारणांत, सामाजिक सुधारणेंत, संशोधन करण्यांत, प्रवास करण्यांत, क्रिकेट सारख्या एखाद्या खेळांत, किंवा गायन, वादन, नृत्य, शिल्प, अशा एखाद्या कलेंत असामान्य प्रवीण असेल तर सामान्य लोक त्या आत्मचरित्राकडे अधिकच आकृष्ट होतात. अशा त-हेने वेगवेगळ्या क्षेत्रांत कीर्ति संपादन केलेल्या कितीतरी पाश्चिमात्य व्यक्तींनीं आपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत. त्या पैकीं कांही आत्मचरित्रें वाचीत असतांना आपण एखादी कादंबरी तर

वाचीत नाहीं ना, असा आपणास भास होतो. इतकीं हृद्य आहेत. याचें कारण असें कीं त्या आत्मचरित्रांतील भाषा, प्रसंगांची मांडणी, निवेदनाची सुलभता आणि मुख्य म्हणजे एका मागून एक घटना सांगतांना सत्याचा केलेला पाठपुरावा यामुळें तीं आत्मचरित्रें, वाङ्मयांतील बहुमोल लेणीं झालेलीं आहेत.

आपल्या मराठी भाषेंत ही आर्वाचिन काळांत नाना फडणवीस यांच्या अपुऱ्या आत्मचरित्रा पासून तों कै. चिंतामण गणेश कोल्हटकर यांच्या मध्यवर्ती सरकार तर्फे उत्कृष्ट ग्रंथ म्हणून पांच हजार रुपयांचें पारितोषक मिळालेल्या 'बहुरूपी' या आत्मचरित्रा पर्यन्त अनेक आत्मचरित्रें लिहिलीं गेलीं आहेत. या सर्व आत्मचरित्रांचें समीक्षण एखाद्या स्वतंत्र ग्रंथांत होणें आवश्यक आहे. कारण त्या शिवाय अमुक एक आत्मचरित्र उत्कृष्ट कां आहे आणि आमुक एक निकृष्ट कां आहे याचीं उदाहरणें वाचकांना वाचायला मिळणार नाहींत.

आत्मचरित्रा विषयी थोडी फार साधक बाधक चर्चा करणारें पुस्तक प्रो. अ. म. जोशी आणि डॉ.प्र. व. माचवे यांनी 'चरित्र आत्मचरित्र आणि टीका ' या नावानें अठरा वर्षांपूर्वी प्रकाशित केलें. त्या पुस्तकाची मर्यादा लक्षांत घेऊन लेखक व्दयांनीं आत्मचरित्रा बाबत मांडलेला दृष्टिकोन सर्वमान्य होण्या सारखा आहे. परंतु

१. आत्मचरित्रांचा सविस्तर इतिहास,
२. उत्कृष्ट आत्मचरित्रांची सखोल अशी छाननी,
३. टाकाऊ आत्मचरित्रांची निकृष्टता दाखविणारे सामान्य नियम आणि त्या दाखल दिलेले पुरावे,
४. आत्मचरित्राचीं साधनें कोण कोणतीं आहेत या विषयीं केलेली सखोल चर्चा आणि त्या वरून काढलेला निष्कर्ष,
५. आत्मचरित्राला विव्दत्तेची आवश्यकता आहे की नाही ?
६. आत्मचरित्राची सुरुवात कशी करावी ?
७. कोण कोणत्या ग्रंथांचा आत्मचरित्रांत समावेश करावा आणि कां करावा ?

८. आत्मचरित्र केव्हा लिहावें ;

९. प्राचीन संस्कृत नि मराठी वाङ्मयांत आत्मचरित्रपर उल्लेख कोठे कोठे आलेले आहेत या विषयी केलेली चर्चा नि त्या दाखल दिलेले पुरावे,

१०. प्राचीन मराठी वाङ्मयांत जे आत्मचर्चात्मक ग्रंथ आहेत त्यांचें केलेलें समक्षीण,

११. आधुनिक मराठी वाङ्मयांतील काही प्रमुख आत्मचरित्रांची करून दिलेली ओळख,

१२. त्या प्रत्येक आत्मचरित्रां बद्दल तटस्थवृत्तीने केलेलें दिग्दर्शन,

१३. भाषांतरित आत्मचरित्रा विषयी सादर केलेली माहिती,

१४. एक उत्कृष्ट आत्मचरित्र म्हणून महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांच्या आत्मचरित्राची करून दिलेली किंचित ओळख,

१५. इंग्रजी, हिंदी, गुजराथी, कानडी, मल्याळी, उर्दू इत्यादि भाषेंतील काही आत्मचरित्रांची जोडलेली यादी,

१६. आधुनिक आत्मचरित्रांतून आलेली राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक माहिती आणि ती सादर करतांना दाखविलेली योजकता आणि सुसूचकता,

१७. देव आणि दैव या विषयी आत्मचरित्रांतून अधून मधून आलेलें वर्णन,

१८. ' आत्मचरित्रकारांच्या अनुभवाचें सार, '

१९. या सर्व आत्मचरित्रांचें केलेलें विहंगमावलोकन,

२०. समाजाच्या ऊर्जितावस्थेसाठी, अज्ञानाचे दुष्परिणाम काय होतात हें पुन्हा पुन्हा सांगणें, त्यासाठीं निःस्वार्थी कार्यकर्त्यांची परंपरा कशी आवश्यक आहे हें दाखविणें, समाजांत समता स्थापन होण्याची जरुरी कां व कशी आहे हें समजावून सांगणें, समाजांत सार्वजनिक नीतिमत्ता वाढीस लागली पाहिजे आणि या साठीं

कोणीही ' आपल्याला काय करायचें आहे' असें न म्हणता व तसें न वागता सर्वांनी प्रयत्नाची पराकाष्टा कशी करायला पाहिजे याची साधक बाधक चर्चा आत्मचरित्रांच्याच आधारानें करणें आणि,

२१. ' माणूसकीचा महिमा पटविण्यासाठीं ' घरोघरीं ज्ञानदीप उजळले पाहिजेत असा निष्कर्ष या आत्मचरित्रांच्या आधाराने काढून दाखविलेला आहे.

या सार्‍या गोष्टी अगदी नवीन आहेत. या गोष्टींच्या अवलोकनानें जिज्ञासू वाचकांच्या ज्ञानांत तर भर पडेलच पण त्यांना प्रत्येक प्रश्ना कडे सार्वजनिक आणि राष्ट्रीय दृष्टिकोनांतून पाहण्यासाठीं आत्मचरित्रकारांनीं कसा प्रयत्न केला आहे हें हि दिसून येईल.

या वर सांगितलेल्या मुद्यांची आणि त्यांच्या अनुषंगाने सादर केलेली माहिती आणि ती सादर करतांना अनेक मुद्यांची केलेली गुंफण या गोष्टींचाही येथें मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. विषय जरी किचकट असला तरी त्या विषयीं वाचकांना वाचावेसें वाटावें म्हणून भाषेची सुलभता आणण्यासाठीं प्रयत्न केलेला आहे.

या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करता ' मराठी वाङ्मयातील आधुनिक आत्मचरित्रांचें समीक्षण ' हा प्रबंध आत्मचरित्र विषयक ज्ञानांत आणि सर्व सामान्यपणें मराठी वाङ्मयात मोलाची भर घालील असें नम्रतेनें म्हणावेसें वाटतें.

* * *

## STATEMENT NO. 2

## SOURCES, INDEBTEDNESS AND ORIGINALITY.

In the preparation of the present work I have fully drawn upon all the available literature in print in many languages. An acknowledgement has been fully made in proper places.

I studied the text and the relevant literature and tried to express my views after a critical study.

आधुनिक मराठी वाङ्मयातील आत्मचरित्रांचें यावर सांगितल्या प्रमाणें समीक्षण करावयाचें म्हणजे बरेंच अवघड असें कार्य होतें. जसें पोहायला शिकायचें म्हणजे पाण्यांतच पुनः पुनः डुबावें लागतें आणि पुनः पुनः प्रयास करावा लागतो, त्या प्रमाणें आत्मचरित्रांचें समीक्षण करतांना मला अनेक आत्म चरित्रें पुनः पुनः वाचावीं लागलीं. त्यांतील सिद्धांत खरे खोटे हें पडताळून पाहण्यासाठीं दुसऱ्या अनेक आत्मचरित्रांत तसे सिद्धांत आले आहेत की नाहींत हें हीं पाहावें लागलें. अशा त.हेनें अनेक आत्मचरित्रावरून अवलोकन झालेले सिद्धांत मोठ्या समर्पक पद्धतीने आणि योग्य अशा भाषेंत मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या साठीं अनेक ग्रंथांचा उपयोग केलेला आहे. तसेंच त्या त्या ग्रंथकारांचें घेतलेलें ऋण मान्य केलें आहे व तसा निर्देशही केला आहे.

प्रो. अ. म. जोशी आणि डॉ. प्र. ब. माचवे यांनी लिहिलेल्या ' चरित्र, आत्मचरित्र आणि टीका ' या ग्रंथाचा बराच उपयोग करून घेतला आहे आणि तसा निर्देशही करण्यांत आला आहे. या शिवाय आणखी अनेक ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला असून त्या त्या सर्व ग्रंथांचा उल्लेख त्या त्या ठिकाणीं केलेला आहे. या सर्व ग्रंथकारांचा मी अत्यंत ऋणी आहे.

* * *